# एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प हवेली

**विभाग :- आस्थापना**

पंचायत समिती हवेली, जुनी पुणे जिल्हा परिषद इमारत, सोमवार पेठ पुणे - 01

दुरध्वनी क्रमांक 020-26124373 Email icdshaveli2015@gmail.com

जा.क्र. एबाविसेयो/आस्थापना/284/2026 दिनांक 22/06/2026

प्रति,

मा.जिल्हा कार्यक्रम अधिकारी,
महिला व बालकल्याण विभाग
पुणे जिल्हा परिषद पुणे

**विषय** :- अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त पद भरती जाहिरात प्रसिध्दी बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प हवेली अंतर्गत 01 अंगणवाडी सेविका व 08 मदतनीस पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची भरती करणे करिता जाहिरात साबत सादर करण्यात येत आहे. तरी ती ऑनलाईन प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती.

आपली विश्वासु

22/06/2026

**( निलम भूमकर )**
बाल विकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प

हवेली

सहपत्र- अंणवाडी सेविका व मदतनीस भरती जाहिरात

Scanned with OKEN Scanner

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प हवेली पुणे जिल्हा परिषद पुणे
## अंगणवाडी सेविका / मदतनीस पद भरती जाहीर प्रगटन / जाहिरात सन - २०२६

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र शासन, म.बा.वि.वि.शा.नि.क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का. ६ दि.२.०२.२०२३
२. महाराष्ट्र शासन, म.बा.वि.वि.शा.नि.क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का. ६ दि. ११.०८.२०२३
३. महाराष्ट्र शासन, म.बा.वि.वि.शा.नि.क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का. ६ दि. १३.१२.२०२३
४. महाराष्ट्र शासन, म.बा.वि.वि.शा.नि.क्र. एबावि-२०२२/प्र.क्र. १७५/का. ६ दि. १०.०१.२०२४
५. महाराष्ट्र शासन, म.बा.वि.वि.शा.नि.क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का. ६ दि.२७.०२.२०२४
६. महाराष्ट्र शासन, म.बा.वि.वि.शा.नि.क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का. ६ दि.३०.०१.२०२५
७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद पुणे यांचेडील पत्र जा.क्र. जिप. मबाक / आस्था ३/८३४/२०२५ दिनांक ३१.०७.२०२८
८. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. जिप.मबाक/ आस्था ३/१०३१/२०२५ दि १३/११/२०२५
९. माहे ४ एप्रिल २०२६ पं.स. हवेली मासीक सभा ठराव
१०. माहे ४ एप्रिल २०२६ मबाक समिती जि.प.पुणे मासिक सभा सुचना
११. कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक १८/०६/२०२६

जा.क्र.एबाविसेयो/आस्था/कावि/पदभरती/ २४६ /२०२६ दि. १८/०६/२०२६

**जाहिरात / फेर जाहिरात २०२६**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प हवेली, तालुका हवेली, जिल्हा पुणे प्रकल्पांतर्गत खालील ग्रामपंचायतीच्या महसुली गाव कार्यक्षेत्रात केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत रिक्त अंगणवाडी **सेविका / मदतनीस पदांकरीता** उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ६ चे शासन निर्णयानुसार जाहीरात देऊन भरणेची कार्यवाही करणेत येत आहे. अंगणवाडी सेविका / मदतनीस या मानधनी पदासाठी जाहिराती मधील नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणारे पात्र मुली / महिला उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात अर्ज संदर्भ क्रमांक ७ अन्वये केवळ ऑनलाईन पद्धतीने (Online) **सखी सहेली पोर्टल** माध्यमातुन **https://zppune-wcd.chanakyasoft.com** या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह सादर करणेचा कालावधी **दिनांक ०६/०७/२०२६ ते दिनांक १७/०७/२०२६** पर्यंत आहे. **तसेच कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

### १. रिक्त पदांचा तपशिल

**१.१) रिक्त पदाचे नाव- अंगणवाडी सेविका पदसंख्या - ०१**

| अ.क्र. | महसुली गावाचे नाव | अंगणवाडी केंद्राचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | केसनंद | केसनंद गावठाण | ०१ |

**१.२.) रिक्त पदाचे नाव: अंगणवाडी मदतनीस पदसंख्या — ०८**

| अ.क्र. | महसुली गावाचे नाव | अंगणवाडी केंद्राचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | आव्हाळवाडी | आव्हाळवाडी 1 | अंगणवाडी मदतनीस |
| 2 | फुलगाव | फुलगाव | अंगणवाडी मदतनीस |
| 3 | अष्टापुर | खोलशेत | अंगणवाडी मदतनीस |
| 4 | सांगरूण | सांगरूण | अंगणवाडी मदतनीस |
| 5 | खेड | खेड | अंगणवाडी मदतनीस |
| 6 | शिवापुर | शिवापुर | अंगणवाडी मदतनीस |
| 7 | मालखेड | मालखेड | अंगणवाडी मदतनीस |
| 8 | लोणीकंद | लोणीकंद- 2 | अंगणवाडी मदतनीस |

Scanned with OKEN Scanner

२) पात्रता:

२.१) शैक्षणिक पात्रता:

| अ.क्र. | पदाचे नाव | किमान आवश्यक शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | अंगणवाडी सेविका/मदतनीस | इयता बारावी उत्तीर्ण अथवा समकक्ष |

**२.१.१)** तसेच किमान शैक्षणिक अर्हतेच्या वरील सर्व शैक्षणिक पात्रतेच्या जसे पदवी, पदव्युत्तर, डी.एड, बी.एड., MS-CTT व समकक्ष इ. असल्यास त्याची सर्व सुस्पष्ट गुणपत्रिका (पास/नापास) ज्यावरुन टक्केवारी निश्चित करता येईल अशा सर्व गुणपत्रिकेच्या छायांकित प्रती सक्षम प्राधिकारी यांचेकडुन साक्षांकित करून घेउन अर्जासोबत जोडाव्यात. गुणपत्रिका / प्रमाणपत्र जोडले नसेल तर गुण देय होणार नाहीत.

**२.२) वास्तव्य (स्थानिक रहिवासी असणे) अट:** अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदाकरीता अर्जदार महिला ही त्या गावातील ग्रामपंचायत नव्हे तर फक्त महसुली गाव वाडी /वस्ती/पाडे यातीलच उमेदवारांना स्थानिक समजण्यात येईल व अशी महिला उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहील. **याकरिता तहसिलदार यांचेद्वारे देणेत आलेला रहिवासी दाखला ग्राह्य धरणेत येईल.**

**२.३) वयोमर्यादा:** वरील सर्व पदासाठी अर्ज करण्याच्या सुरुवातीच्या दिनांक वेळीचे वयाची अट **किमान १८ वर्षे पूर्ण व कमाल ३५ वर्षे** अशी आहे. तथापि विधवा उमेदवारांसाठी ही वयोमार्यादा कमाल ४० वर्ष राहील. या करीता उमेदवाराने जन्मतारखेचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (T.C.) अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील.

**२.४) भाषेचे ज्ञान** : मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने इयत्ता १० वी अथवा शासन निर्णय दिनांक - ०२ फेब्रुवारी २०२३ मधील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

**२.५) लहान कुटुंब:** अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिस या पदांवरील थेट व सरळ सेवेनेनियुक्तीसाठी लहान कुटुंबाची अट खालीलप्रमाणे लागू राहील.
२.५.१ )लहान कुटुंब याचा अर्थ, उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये.
२.५.२) उमेदवाराला दोन हयात अपत्यांपेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल. तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) असुन देखील तिसरे अपत्य झाल्यास त्यांच्या सेवासमाप्त करण्यात येईल.
२.५.३) उमेदवाराने लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र परिशिष्ट "ब" अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. अविवाहित महिला उमेदवारांनी सुध्दा 'लागू नाही' असे नमुद करुन प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**३) अतिरिक्त गुण :**

**३.१) विधवा व अनाथ** :- विधवा व अनाथ उमेदवारांच्या बाबतीत अशा उमेदवारास परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केल्यानुसार **अतिरिक्त १० गुण** देण्यात येतील. (विधवा असल्याचा दाखला अथवा पतीच्या मृत्युचा दाखल्यासह पुर्नविवाह न केल्याचे स्वयंघोषणापत्र जोडण्यात यावे. अनाथ असल्याबाबतचे महिला बाल विकास विभाग यांचे कडून प्राप्त प्रमाणपत्र जोडावे.)

Scanned with OKEN Scanner

**३.२) अनुभव असल्यास:-** एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प योजनेची अंगणवाडी सेविका/ मिनी सेविका / मदतनीस, किमान २ वर्षे अनुभव असल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडुन प्राप्त अनुभव प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे, **खाजगी मान्यताप्राप्त अथवा खाजगी अनुदानित संस्थेत सेवा अनुभव ग्राहय धरला जात नाही.**

**३.३) जातीचे प्रमाणपत्र:** अर्जदार मागासवर्गीय प्रवर्गात मोडत (अनुसूचित जाती / जमाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, विषेश मागास प्रवर्ग किंवा इतर मागास वर्गीय प्रवर्ग, SEBC ) असल्यास सक्षम प्राधिका-याचे जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. **जात प्रमाणपत्रासाठी पोहच पावती व इतर पुरावा ग्राहय धरला जात नाही.** शंकास्पद/क्लिष्ट प्रकरणात जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी कार्यालयामार्फत केली जाते. **त्यानुसार उमेदवारास जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. अशा उमेदवारास परिशिष्ठ अ मध्ये नमुद केल्यानुसार अतिरीक्त गुण देण्यात येतील.**

**४) बदली:** अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे तसेच ती स्थानिक रहिवाशी असावी या केंद्र शासनाच्या मार्गदर्शकसुचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान नाही.

**५) सेवा समाप्तीचे वय:** शासन निर्णय दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३ अन्वये नियुक्त होणा-या अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिस यांची सेवा ६० वर्षे पूर्ण होई पर्यंत किंवा त्या शाररिकदृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत सुरू ठेवण्यात येईल.

**६) मानधन:** अंगणवाडी सेविका व मदतनीस ही पदे मानधनी आहेत तसेच या पदाकरिता सेवानिक मानधन व इतरही बाबतीत (या जाहीरनाम्यात उल्लेखित नसलेले अटी व शर्ती) या खेरीज सौबतच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रक (ध्येय व धोरणे) लागु राहतील. **ही पदे नियमित शासकीय पदे नसल्यामुळे या पदास शासकीय सेवेच्या कोणत्याही सवलती उपलब्ध नाहीत.**

**७) उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना -**

७.१ अर्जदार महिला उमेदवार असणे आवश्यक आहे. विवाहीत अथवा अविवाहीत असा कोणताही भेद करण्यात आलेला नाही.

७.२ उमेदवारांनी अंगणवाडी पदभरती करिता **https://zppune-wcd.chanakyasoft.com** या संकेत स्थळावर जाउन विहीत मुदतीत सर्व दावे आणि त्याच्या पुष्टयर्थ सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करताना सर्व छायांकित प्रती या सक्षम प्राधिका-याकडुन सांक्षाकित करून **फक्त ऑनलाईन अर्ज करावा. ऑफ़ लाईन अर्ज कोणत्याही परिस्थिती मध्ये स्विकारला जात नाही.**

७.३ अर्ज करण्याच्या अंतीम दिनांका पर्यंतचेच उमेदवारांनी धारण केलेल्या शैक्षणिक पात्रता व प्राधान्य बाबतचे दावे ग्राह्य धरण्यात येतात तसेच त्या दाव्यांबाबतची कागदपत्रे अर्ज करण्याच्या अंतीम दिनांका पर्यंत ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे. अंतीम दिनांका नंतर केलेले दावे किंवा सादर केलेली कागद पत्रे यांचा विचार केला जात नाही.

७.४) उमेदवाराचे वयाकरीता जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरण्यात येतो.

७.५) उमेदवाराने सक्षम प्राधिकारी यांचे कडुन प्राप्त केलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येते,

७.६) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्रा साठी अर्जा सोबत प्राप्त परिशिष्ठ उमेदवाराने स्वतः भरून द्यायचे आहे.

७.७) अर्जदाराचे नावात बदल असल्यास सक्षम अधिकारी यांचा विवाह नोंदणी दाखला किंवा नावात बदल असल्याबाबतचे राजपत्र (Gazette) किंवा नोंदणीकृत (सेतु/नोटरी) हलफनामा/शपथपत्र जोडण्यात यावे.

७.८) अर्जासोबत जोडलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्पावर खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबधित शासन आदेश / नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिका-याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास प्रकल्प कार्यालयामार्फत घेण्यात येणा-या निवडीपासुन उमेदवारास कायमस्वरूपी प्रतिरोधित करण्यात येईल. शिवाय उमेदवाराची शिफारस झाली असल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने रदद करणेत येईल,

Scanned with OKEN Scanner

याबाबत संबंधीतांशी कोणताही पत्रव्यवहार कार्यालयामार्फत केला जाणार नाही. तसेच शासनाची फसवणुकीचा आरोप ठेऊन अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

७.९) अंगणवाडी पदभरती मधून निवडलेल्या सर्व उमेदवारास महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबाविं २००६/प्र.क. ३००/का.०६ दि.१२ एप्रिल २००७ लागू राहील. ज्या द्वारे कामात कर्तव्यात गैरव्यवहार करणा-या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मानधनी सेवेतून कमी करण्यात येते.

७.१०) अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिस या दोन्ही पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास दोन्ही पदांसाठी स्वतंत्र अर्ज करणेत यावेत.

**७.११)** अंगणवाडी केंद्र ज्या महसुल गांवामध्ये असेल त्याच महसुल गावामधील **स्थानिक रहिवासी असलेला** उमेदवार असावा. स्थानिक रहिवाशी नसल्यास अर्ज स्वीकारण्यात येत **नाही.**

७.१२) प्राथमिक गुणवत्ता यादीतील कोणत्याही उमेदवाराची वैयक्तिक माहिती खोटी असल्याची इतर अर्ज केलेल्या उमेदवाराचा आक्षेप / हरकत किंवा स्वत:चे कागदपत्रांमध्ये सुधारणा करावयाची असल्यास प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यापासुन **१० दिवसाच्या आत अर्जदाराने स्वत: सखी सहेली पोर्टल वरील स्वत:च्या प्रोफाईल द्वारे ऑनलाईन आक्षेप / हरकत नोंदविणेची आहे. त्यानंतर व इतर मार्गाने / पध्दतीने सादर केलेले आक्षेप / हरकत यांची कोणत्याही परस्थितीत दखल घेतली जात नाही.**

७.१३) अंगणवाडी सेविका व मदतनीस पदाकरिता अंतिम निवड झाल्यास उमेदवारास शासन निर्णय क्र. एबाविं-२०१०/प्र.क्र. १२४/का-६, दि. ०५ ऑगस्ट २०१० नुसार पंचायत राज संस्थांच्या / जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य असल्यास कोणत्याही एका पदाचा राजीनामा द्यावा लागेल.

७.१४) नियुक्ती झालेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी कोणत्याही प्रकारची इतर निमशासकीय / खाजगी नोकरी करता कामा नये अगर राजकारणात भाग घेता कामा नये तसे आढळून आल्यास त्यांची नियुक्ती आपोआप रद्द समजण्यात येईल.

७.१५) सदर जाहीर प्रगटन / जाहिरातीत काही बदल अटी / नियम वाढविणे / पुढे ढकलणे / कोणतेही वेळी, कोणत्याही टप्यावर स्थगित किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प हवेली यांना राहतील.

७.१६) **ऑनलाईन अर्ज करण्याची अंतीम दिनांक १७ जुलै २०२६ नंतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाही.**

**उमेदवारांनी ऑनलाईन रित्या पदभरतीकरीता अर्ज भरण्यासाठी शेजारी दिलेल्या QR code ला, QR code Scanner ने किंवा गुगल लेन्सने स्कॅन करून ऑनलाईन फ़ॉर्म भरण्याच्या वेबसाईटची लिंक प्राप्त करून घ्यावी व ऑनलाईनफ़ॉर्म भरावा."**

( निलम विठ्ठल भुमकर) 18/6/2026
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना**
**प्रकल्प हवेली . जि.प.पुणे**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१.मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक)पुणे जिल्हा परिषद पुणे .

२.मा.गटविकास अधिकारी , पंचायत समिती हवेली जि.पुणे

३. ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय - केसनंद, आव्हाळवाडी, फुलगाव, अष्टापुर, सांगरुण, खेड, शिवापुर, मालखेड, लोणीकंद ता.हवेली जि.पुणे

Scanned with OKEN Scanner

## ऑनलाईन अर्जासोबत खालिल कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

1. इयत्ता 12 वी उत्तीर्ण गुणपत्रक ( राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष ) - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
2. इयत्ता 12 वी उत्तीर्ण नंतर इतर शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेस त्या सर्व शैक्षणिक अर्हतांचे गुणपत्रक – पदवी , पदव्युत्तर, डीएड, बीएड, एमएससीआयटी (समकक्ष) इ. सांक्षाकित (ॲटेस्टेड) प्रत
3. स्थानिक गावातील रहिवाशी ( ग्रामपंचायत नव्हे ) असलेबाबत संबधित तहसीदार यांचेद्वारे देणेत आलेला रहिवाशी दाखला - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
4. वयोमर्यादेबाबत जन्मदाखला / शाळा सोडलेचा दाखला - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
5. लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र - विहित नमुन्यातील ( परिशिष्ट - ब ) - मूळ प्रत
6. विधवा महिला ( स्थानिक ) असलेबाबत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला / प्रतिज्ञापत्र ( ॲफेडेव्हीट ) / स्वयंघोषणापत्र - लागू असलेस - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
7. अनाथ महिला उमेदवार ( स्थानिक ) असलेबाबत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला / प्रतिज्ञापत्र ( ॲफेडेव्हीट ) / स्वयंघोषणापत्र - लागू असलेस - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
8. स्वतःचा जातीचा दाखला - लागू असलेस तहसिलदार / सक्षम प्राधिकारी यांचा दाखला - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
9. आर्थिकदृष्टया दुर्बल घटक / सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग - लागू असलेस तहसिलदार / सक्षम प्राधिकारी यांचा दाखला - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
10. अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी 2 वर्षाचा अनुभव ( शासकीय ) - लागू असलेस सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत
11. नावात बदल असलेस राजपत्र / विवाह नोंदणी दाखला / प्रतिज्ञापत्र ( ॲफेडेव्हीट ) इ. पुरावे. - सांक्षाकित ( ॲटेस्टेड ) प्रत

**उमेदवारांनी ऑनलाईन रित्या पदभरतीकरीता अर्ज भरण्यासाठी शेजारी दिलेल्या QR code ला, QR code Scanner ने किंवा गुगल लेन्सने स्कॅन करून ऑनलाईन फ़ॉर्म भरण्याच्या वेबसाईटची लिंक प्राप्त करून घ्यावी व ऑनलाईनफ़ॉर्म भरावा."**

Scanned with OKEN Scanner

# लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र
## परिशिष्ट ( ब )

मी श्रीम. ______________________________ श्री. ______________________________

यांची मुलगी / पत्नी वय वर्ष ______ राहणार ______________________________

तालुका हवेली, जिल्हा पुणे याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

1. मी अंगणवाडी मदतनीस, अंगणवाडी केंद्र ____________ या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

2. आज रोजी मला खालीलप्रमाणे मुले आहेत.

| अ.क्र. | मुलाचे / मुलीचे नाव | जन्मदिनांक | वय वर्ष |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |

3. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असल्यास नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही तसेच सदर वाव नियुक्तीनंतर निदर्शनास आल्याय मला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करणेत येईल तसेच सेवा कालावधीमध्ये दोन हयात अपत्य असून देखील तिसरे अपत्ये झाल्यास सेवा समाप्त करणेत येईल याची मला जाणीव आहे.

4. मला दोनपेक्षा जास्त अपत्य होणार नाहीत यासाठी मी कुटुंब नियोजन करून घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण :-
दिनांक :-

स्वाक्षरी
( नाव :- ______________________________ )

Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय क्रमाक :- प्रसुधा 1614 / 345 / प्र.क्र.71 / 18 – अ दिनांक 09 मार्च 2015

# प्रपत्र - ब

## स्वयं घोषणापत्र

| अर्जदार फोटो |
|---|

मी श्रीम. ______________________ श्री. ______________________

यांची मुलगी / पत्नी वय वर्ष _____, आधार क्रमांक ______________________ राहणार ______________________ तालुका हवेली, जि. पुणे याद्वारे घोषित करतो / करते की, मी अंगणवाडी सेविका / मदतनीस पद भरती प्रक्रियेत सखी – सहेली पोर्टल माध्यमातुन https://zppune-wcd.chanakyasoft.com या संकेतस्थळावर अर्ज सादर करणेकामी दिलेली सर्व माहिती माझया व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे आणि मी सदर अर्जासोबत जोडलेल्या प्रती या मुळ कागदपत्रांच्या सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता किंवा संवधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-
दिनांक :-

स्वाक्षरी
( नाव :- ______________________ )

Scanned with OKEN Scanner